महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ १० ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १०७ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

लक्षवेधी




## भिवंडीतील अवैध प्रसूतिगृहांवर मनपाचे छापे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. ९ :** भिवंडी शहराच्या झोपडपट्टी भागांत बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट असताना, आता पालिका प्रशासनाने अवैधरित्या प्रसूती आणि उपचार करणाऱ्या दायी महिलांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. आयुक्त अनमोल सागर यांच्या कठोर निर्देशानुसार, वैद्यकीय आरोग्य विभागाने आता थेट चार दायी महिलांवर गुन्हे दाखल केले आहेत. शहरातील शांतीनगर परिसरातील गायत्रीनगर, फातिमा नगर आणि आझाद नगर या भागांत वैद्यकीय परवाना नसताना काही महिला अनधिकृत प्रसूती व उपचार करत असल्याची माहिती पालिकेला मिळाली होती. बुधवारी (ता. ९) रात्रीच्या सुमारास मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप गाडेकर आणि नियंत्रण प्रमुख डॉ. जयवंत धुळे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रिया फडके, डॉ. राजकुमार शर्मा, डॉ. अक्सा अन्सारी आणि शांतीनगर पोलिसांच्या मदतीने संबंधित ठिकाणी छापे टाकले. या छाप्यादरम्यान, चार महिला कोणत्याही वैद्यकीय परवान्याशिवाय प्रसूती व महिलांवर उपचार करताना आढळून आल्या. पालिकेच्या पथकाने तातडीने या चारही महिलांना ताब्यात घेतले. सलमा बानो जैनूल शेख (४०), नीलम रतन चौरसिया (३९), नुसरत बानो सुफियान अहमद खान (४६), निसाद बानो मुमताज अहमद अन्सारी (४४) या महिलांकडून ३८ हजार ७६४ किमतीची ॲलियोपॅथीची औषधे आणि वैद्यकीय उपकरणे जप्त केली आहेत.

## वालधुनी नदीत रासायनिक पाणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

आज पुन्हा एकदा आनंदनगर एमआयडीसीतील केमिकल कंपनीकडून रासायनिक पाणी वालधुनी नदीत सोडले आहे. हे दूषित पाणी वाहत जाऊन गोविंद तीर्थ पुलाजवळ पोहोचले आहे. रात्रीपासून परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. सध्यादेखील परिसरात प्रचंड वास येत आहे. गेल्या आठवड्यातही पोलिस नियंत्रण कक्षाला याबाबत माहिती देण्यात आली होती. त्या वेळी एक पोलिस तक्रार केल्यानंतर दोन तासांनी घटनास्थळी आला आणि पाहणी करून 'शोध घेऊ' असे सांगून निघून गेला; मात्र त्यानंतर काहीही कारवाई झालेली नाही.

यासंदर्भात पालिका मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांनी सांगितले, की पावसाळ्यापूर्वी पालिकेच्या वतीने वालधुनी नदीची स्वच्छता मोहीम राबवण्यात आली आहे. दरम्यान, ज्या कारखान्यातून हे सांडपाणी सोडले जात आहे त्या कंपन्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी ही प्रदूषण मंडळाची असल्याचे त्यांनी सांगितले.

# जीवनदीप महाविद्यालयात देवाभाऊ व्हिजन रिसर्च प्रोजेक्टचा भव्य शुभारंभ

### 75 दिवसात 6 हजार विद्यार्थी, 1500 वाहन चालकांसह 1500 कामगारांची केली जाणार नेत्र तपासणी

### 3 हजार जणांच्या डोळ्यावर केली जाणार मोतीबिंदू शस्त्रक्रिया

### जीवनदीप महाविद्यालय होणार दृष्टीदोष रहीत महाविद्यालय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली दि. ९ :** मानवाला प्राप्त झालेल्या ज्ञानइंद्रियांपैकी डोळा हा एक अतिशय मौल्यवान व महत्त्वाचे ज्ञानइंद्रिय आहे. ग्रामीण भागात बऱ्याचदा या डोळ्यांच्या आजारांकडे दुर्लक्ष करताना नागरिक दिसतात व यामुळे त्यांना मोतीबिंदू व डोळ्यांचे इतर आजार जडतात. आज गुरुवारी ९ ऑक्टोबर रोजी जागतिक दृष्टी दिनाचे औचित्य साधत जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे नेत्र तपासणी व उपचार महा शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. व्हिजन फ्रेंड साकिब गोरे, जीवनदीप शैक्षणिक संस्था, नेत्रम केअर गुड व्हिजन यांच्या संयुक्त विद्यमाने या महाशिबिराचा तसेच रिसर्च प्रोजेक्टचा शुभारंभ करण्यात आला.

दरवर्षी ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात गुरुवारी हा दिवस साजरा केला जातो. अतिशय बिकट परिस्थितीतून पुढे येत गोरगरीब, कष्टकरी, चालक, हमाल इत्यादी लोकांच्या डोळ्यांची काळजी घेत त्यांच्या डोळ्यांवर मोतीबिंदूची मोफत शस्त्रक्रिया करून तसेच मोफत चष्मे



वाटप करून अविरत सेवा करणारे दृष्टी मित्र साकिब गोरे यांनी या रिसर्च प्रोजेक्टचा जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथून या कार्याची सुरुवात केली. जीवनदीप महाविद्यालयात परिसरातील नागरिकांसाठी हा कार्यक्रम पुढील दीड महिने महाविद्यालय परिसरात सुरू राहणार आहे.

यावेळी आमदार किसन कथोरे, सुलभा गायकवाड, कुमार आयलानी, निरंजन डावखरे, आयुष्यमान भारतचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे, ठाणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी, अशोक फर्डे, प्रसन्ना देशमुख, अशोक लोणे, उपेंद्र गायकवाड, जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे, प्रकाश गाडे, डॉ. दीपलक्ष्मी मेश्राम, डॉ.आशा गुंजाळ आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

आमदार निरंजन डावखरे यांनी भारत माता की जय बोलत या महाशिबिराची लाल फीत कापत शुभारंभ केला. दृष्टी मित्र साकीब गोरे यांच्या संकल्पनेतून हा प्रोजेक्ट राबविला जात आहे. या प्रोजेक्टच्या माध्यमातून ७५ दिवसात जीवनदी महाविद्यालयातील ६ हजार विद्यार्थी, भिवंडीतील १५०० वाहन चालक, १५०० पा'वरलूमधी लकामगार यांची नेत्र तपासणी केली जाणार आहे. तसेच ३ हजार जणांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया केली जाणार आहे. जीवनदीप महाविद्यालय हे दृष्टी दोष रहित महाविद्यालय होणार आहे.

आमदार कथोरे यांनी सांगितले की, दृष्टी दोष कोणालाही राहू नये यासाठी साकीब गोरे या दृष्टी मित्राचे काम खरोखरच उल्लेखनीय आहे. त्यांनी त्यांचे काम सातसमुद्रापार नेले आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी विभागाचे प्रमुख शेट्ये यांनी सांगितले की, कोणाचाही आर्थिक मदत न घेता केवळ आरागेृया विषयी सामाजिक बांधीलकी जपण्याच्या उद्देशाने दृष्टी देण्याचे काम करणारे दृष्टी मित्र गोरे यांचे काम खरोखरच इतरांपेक्षा वेगळे आहे.

दृष्टीमित्र गोरे यांनी सांगितले की, विद्यार्थी, वाहन चालक आणि कामगार यांचा दृष्टी दोष घालविणे हा या प्रोजेक्टचा मुख्य हेतू आहे. गेल्या ३४ वर्षापासून नेत्र तपासणी, चष्मे वाटप आणि मोती बिंदू शस्त्रक्रियांचे काम करीत आहे. आत्तापर्यंत २९ लाख जणांची नेत्रतपासणी, १८ लाख जणांना चष्मे वाटप आणि ६५ हजार जणांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. या प्रोजेक्टवर १६ देश एकत्रित येऊन काम करीत आहेत. जर्मनीचे गुड व्हीजन, लंडनचे आयएपीबी, व्हीजन २०-२० इंडिया यांचा सहभाग आहे.

संचालक प्रशांत घोडविंदे, प्राचार्य डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्य. प्रकाश रोहणे, निर्मल इंग्लिश मीडियम स्कूल मुख्याध्यापिका भावना कुंभार, एन.एस.एस विभागप्रमुख. प्रा.दिनेश धनगर, एनसीसी प्रमुख प्रा.प्रवीण भालेराव, एनएसएस व एनसीसी स्वयंसेवक, विविध पदाधिकारी, समाजसेवक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी या सर्वांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम पार पडला.



## अक्षय शिंदे एन्काउंटर प्रकरणात पोलिसांना 'क्लीनचीट'

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** बदलापूरच्या शाळेतील लैंगिक अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदेचा एन्काउंटर करणाऱ्या पोलिसांना निर्दोषत्व बहाल करण्यात आले आहे. न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या न्यायालयीन आयोगाकडून पोलिसांना ही 'क्लीनचीट' देण्यात आली आहे. स्वसंरक्षणासाठी अक्षय शिंदेंवर गोळीबार केल्याचा पोलिसांचा दावा न्यायालयीन आयोगाने मान्य केला आहे. न्या. दिलीप भोसले यांच्या आयोगाने 'स्वसंरक्षणासाठी' अक्षय शिंदेवर गोळीबार केल्याचा पोलिसांचा दावा मान्य केला आहे. या निर्णयामुळे एन्काउंटर करणाऱ्या पोलिसांना कायदेशीर दिलासा मिळाला आहे.

यापूर्वी अक्षय शिंदेच्या कुटुंबीयांनी कोणतीही तक्रार केली नसल्यामुळे राज्य मानवाधिकार आयोगाकडूनही पोलिसांना 'क्लीनचीट' मिळाली होती. गोळीबार स्वसंरक्षणासाठी झाल्याचा दावा मान्य केला असला तरी, आयोगाने आरोपीला व्हॅनमधून नेण्याच्या प्रक्रियेवर मात्र काही प्रश्न उपस्थित केले आहेत. आयोगाने या प्रक्रियेत काही त्रुटी आढळल्याचे संकेत दिले आहेत. पोलिसांनी आरोपी अक्षय शिंदेच्या केलेल्या एन्काउंटरवर प्रश्नचिन्ह उभे राहिले होते. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने 'एसआयटी' स्थापन करून चौकशीचे आदेश दिले होते.

तर ही 'एसआयटी' कोर्टाने नव्हे, तर 'डीजीपीं'ना स्थापन करावी, असे आदेश सुप्रीम कोर्टाचे होते. आता न्या. दिलीप भोसले आयोगानेही पोलिसांना निर्दोष ठरवल्याने या वादावर पडदा पडण्याची शक्यता आहे

## कल्याण-अंबरनाथ रस्त्याच्या कामाला मुहूर्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** पावसाळ्यात ठप्प पडलेल्या कल्याण ते अंबरनाथ मुख्य रस्त्याच्या कामाला अखेर मुहूर्त सापडला. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत मानकर यांनी आमदार कुमार आयलानी यांना रस्त्याचे काम पुढील आठवड्यात सुरू करण्याचे आश्वासन बैठकीत दिले.

उल्हासनगरच्या मधोमध जाणाऱ्या कल्याण ते अंबरनाथ रस्ता बांधणीसाठी राज्य शासनाने तीन टप्प्यात ६८ कोटींचा निधी मंजूर केला. मात्र रस्त्याचे काम गेल्या ३ वर्षापासून रखडल्याने, राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत मानकर यांच्या कारभारावर टिका होत आहे. शहरांत सुरू असलेल्या ४५० कोटीच्या निधीतील भुयारी गटार योजना पूर्ण झाल्यावर कल्याण ते अंबरनाथ रस्त्याचे काम सुरू करतो. असे सांगणारे मानकर यांनी पावसाळ्यापूर्वी रस्त्याचे काम सुरू केले होते. तर पावसाळा सुरू होताच रस्त्याचे काम बंद केले. आमदार कुमार आयलानी यांनी राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग व महापालिका बांधकाम विभाग यांची सोमवारी बैठक बोलाविली होती. या बैठकीत शहरातील रस्त्याच्या दुरावस्थेवरून अधिकाऱ्यांना आयलानी यांनी धारेवर धरले.

**शहरातून जाणाऱ्या कल्याण-बदलापूर रस्त्यात जीवघेणे खड्डे झाले असून ट्रक व टेम्पोचे चाके रस्त्यात फसल्याच्या घटना घडल्या आहेत. आमदार आयलानी यांनी घेतलेल्या. बैठकीत रस्त्याचे काम पुढील आठवड्यात सुरू करण्याचे आश्वासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत मानकर यांनी दिले. तसेच २० कोटीतील नागरी सुविधेची २०० कामाला मुहूर्त लागणार असल्याचे मानकर म्हणाले. शहरातील रस्त्याच्या दुरावस्थेबाबत महापालिका शहर अभियंता निलेश शिरसाठे यांना उत्तर देता आले नाही. शिरसाठे यांना आमदार आयलानी यांनी चांगलेच धारेवार धरले. त्यांच्या मदतीला कार्यकारी अभियंता संदीप जाधव धावून गेले. रस्त्याचे कामे व समस्या आमदार आयलानी यांना जाधव यांनी समजावून सांगितल्या. आमदार आयलानी यांनी बैठकीत अधिकाऱ्यांना कामाला लागा, अशा सूचना दिल्या आहेत.**

## ठाणे जिल्ह्यातील पंचायत समिती सभापती पदाचे आरक्षण जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.09 :** ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडील असाधारण राजपत्र, दि.9 सप्टेंबर 2025 अन्वये, राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अध्यक्ष व सभापतीपदाचे आरक्षण अधिसूचना पारित केलेली आहे. या अधिसूचनेनुसार, ठाणे जिल्ह्यातील पंचायत समिती शहापूर / मुरबाड / कल्याण / भिवंडी /अंबरनाथ सभापती पदाची आरक्षण सोडत सभा आज जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन सभागृह, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे पार पडली. पंचायत समिती शहापूर / मुरबाड/ कल्याण / भिवंडी /अंबरनाथ सभापती पदाचे पुढील अडीच वर्षासाठी खालील प्रमाणे आरक्षण सोडतीद्वारे जाहीर करण्यात आले आहे.

- शहापूर पंचायत समिती सभापती आरक्षण:- अनुसूचित जमाती (महिला)
- मुरबाड पंचायत समिती , सभापती आरक्षण:- सर्वसाधारण
- कल्याण पंचायत समिती सभापती आरक्षण:- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग
- भिवंडी पंचायत समिती सभापती आरक्षण:- अनुसूचित जमाती (महिला)
- अंबरनाथ पंचायत समिती सभापती आरक्षण:- सर्वसाधारण (महिला)

या सभेस उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रुपाली भालके, तहसिलदार (सर्वसाधारण) सचिन चौधर, ठाणे जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व नागरिक उपस्थित होते.







## केडीएमसीच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात MRI सुविधा सुरु

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बाई रुक्मिणीबाई रुग्णालय येथे आज दि. ०८/१०/२०२५ रोजी पासून मे. क्रस्ना डायग्नोस्टीक्स लि. आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने MRI सुविधा सुरु करण्यात आली आहे.

मे. क्रस्ना डायग्नोस्टीक्स लि. यांना बाई रुक्मिणीबाई रुग्णालय व शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय येथे रेडीओलॉजी व पॅथोलॉजी सुविधा सुरु करण्यासाठी कार्यादेश देण्यात आले होते व जागा उपलब्ध करुन देण्यात आली होती. शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय येथे सन २०२० पासून MRI, CT Scan, सोनोग्राफी व एक्स-रे सुविधा आणि पॅथोलॉजी तपासणी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच बाई रुक्मिणीबाई रुग्णालय येथे देखील CT Scan, सोनोग्राफी व एक्स-रे सुविधा आणि पॅथोलॉजी तपासणी सुविधा उपलब्ध होती परंतु MRI सुविधा उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय, डोंबिवली येथे जावे लागत होते. आता सदर सुविधा कल्याण मध्येच उपलब्ध झाली आहे.

General Electric कंपनीची सदर MRI मशीन १.५ टेस्ला, ६४ चॅनल्स क्षमतेची असून २४x७ ही सुविधा उपलब्ध असणार आहे. तसेच MRI झाल्यानंतर ४ तासांमध्ये तर इमर्जन्सी केस मध्ये २ तासांमध्ये रिपोर्ट उपलब्ध होणार आहे.तसेच सवलतीच्या दरामध्ये (CGHS + ८ %) सदर सर्व तपासण्या रुग्णांना उपलब्ध होतील अशी अशी माहिती महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांनी दिली आहे.

# "कार्यालयीन कामकाजात मराठीचा वापर करण्याबाबत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जागरुक रहावे"

## डॉ. धनश्री लेले यांचे प्रतिपादन



- कार्यालयीन वापरातील सोपी मराठी या विषयावर झाली कार्यशाळा
- ठाणे महानगरपालिकेत अभिजात मराठी भाषा सप्ताहाची सांगता

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : नेहमीच्या व्यवहारातील भाषा सोपी आणि प्रवाही असली पाहिजे. कमीत कमी शब्दात व्यक्त होणारी भाषा समर्थ असते. कार्यालयीन कामकाजात योग्य शब्द, योग्य जागी वापरुन लिखाण केले तर ते समोरच्या व्यक्तीला समजण्यास सोपे जाते. भाषेमध्ये जडजंबाळपणा नसावा, कार्यालयीन कामकाजात मराठी भाषेचा वापर करताना अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कायम जागरुक रहावे, असे प्रतिपादन डॉ. धनश्री लेले यांनी गुरूवारी ठाणे महानगरपालिका मुख्यालयातील कार्यक्रमात केले.

मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्याच्या वर्षपूर्तीनिमित्त ठाणे महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका मुख्यालय आणि शाळांमध्ये अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात आला. ०३ ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या या सप्ताहाची सांगता महापालिका अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी 'कार्यालयीन वापरातील सोपी मराठी' या विषयावरील कार्यशाळेने झाली. या कार्यशाळेत भाषेच्या अभ्यासक आणि व्याख्यात्या डॉ. धनश्री लेले यांनी मार्गदर्शन केले. महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे ही कार्यशाळा संपन्न झाली. उपायुक्त उमेश बिरारी यांनी याप्रसंगी डॉ. लेले यांचा सत्कार केला.

प्रत्येक भाषेचा लहेजा वेगळा असतो. भाषांतर करणे ही देखील एक कला आहे. भाषा लिहिणे आणि बोलणे हे सहज सोपे असल्याचे वाटतेय मात्र, सोपे लिहिणे आणि बोलणे अवघड आहे. भाषा दोन अक्षरी जरी शब्द असला तरी प्रत्येक भाषेचा आवाका मोठा आहे. लेखी भाषेत विरामचिन्हे योग्य जागी वापरणे आवश्यक असते. विरामचिन्हांवरुन त्या शब्दांचा भाव लक्षात येतो. आपण लिहिलेले समोरच्याला समजण्यासाठी विरामचिन्हांचा वापर होत असतो आणि हीच भाषेची ताकद आहे, असेही डॉ. लेले म्हणाल्या.

शासनाच्या माध्यमातून येणारी पत्रे किंवा सूचना यातील भाषेचा अर्थबोध हा सामान्य माणसांना बरेचदा होत नाही. त्यामुळे कामांना विलंब होण्याची शक्यता असते. म्हणूनच कार्यालयीन वापरातील भाषा सुटसुटीत असणे आवश्यक आहे. वाक्यामध्ये अनावश्यक शब्द नसावेत. कमीत कमी शब्दात अचूक लिहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नियमित कामकाजात जर काही अवघड शब्द आले तर ते सोपे करुन लिहा, असेही डॉ. लेले यांनी नमूद केले. प्रत्येकाने भाषेविषयी जागरूक असले पाहिजे, चौकस असले पाहिजे, प्रत्येकाला प्रश्न पडले पाहिजेत तरच भाषा समृद्ध होण्यास मदत होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

योग्य शब्द, योग्य जागी, योग्य विरामचिन्हांसह वापरून सोपी आणि सुटसुटीत वाक्य रचना करता येते हे डॉ. धनश्री लेले यांनी सोदाहरण स्पष्ट केले. याप्रसंगी, उपायुक्त उमेश बिरारी यांनी सप्ताह काळात झालेल्या कार्यक्रमांचा आढावा घेतला. सूत्रसंचालन राजेंद्र पाटणकर यांनी केले. अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या या सोहळ्याची सांगता सामुदायिक पसायदान गायनाने करण्यात आली.

### दोन दिवसांच्या ग्रंथ प्रदर्शनाला प्रतिसाद

सप्ताहाच्या निमित्ताने दोन दिवसीय ग्रंथ प्रदर्शन आणि विक्रीचेही मुख्यालय येथे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात, साहित्य अकादमी, मॅजेस्टिक बुक डेपो, ज्योत्स्ना प्रकाशन, शारदा प्रकाशन यांनी सहभाग घेतला. या प्रदर्शनास महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी आणि अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी यांनी भेट देऊन पुस्तक खरेदीही केली.

### शाळांमध्ये स्पर्धांचे आयोजन

अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने महापालिकेच्या शाळांमध्ये वक्तृत्व, निबंध, प्रश्नमंजुषा, गद्य आणि पद्य वाचन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय भेटींचे ही आयोजन करण्यात आले होते.

# शिलाहार ते मराठा राजधानीचे बळकट स्थान 'पन्हाळा'

वारणा आणि पंचगंगेची उपनदी असलेल्या कासारी नदीचा जलविभाजक असलेल्या सह्याद्रीच्या पूर्व दिशेने पसरलेल्या रांगेच्या उंच डोंगर पर्नाल पर्वत म्हणजेच पन्हाळा. पन्हाळा हा पावनगड आणि पन्हाळा असा जोड किल्ला आहे. समोरच दख्खनचा राजा म्हणून ओळखला जाणार जोतिबाचा डोंगर याच रांगेत आहे. ईशान्येला पसरलेलं वारणेचे विस्तीर्ण खोरे, पूर्व आणि दक्षिणेकडे पंचगंगा आणि कासारीचे खोरे आणि कोल्हापूर परिसर तर पश्चिमेकडे विशाळगडपर्यंतचा संपूर्ण परिसर.

शिलाहार राजा भोज यांनी बांधलेल्या किल्ल्यांपैकी एक महत्त्वाचा किल्ला म्हणजे पन्हाळा. शिलाहारांच्या कोल्हापूर घराण्याच्या राजधानीचा मान या किल्ल्याकडेच होता. या किल्ल्याच्या वास्तूरचनेतून शिलाहार कालीन वास्तू निर्मिती कशा प्रकारे होती हे दिसून येते. वाघ दरवाजा येथे असलेले मयुर आणि गरुडाचे चिन्ह हे या गडाचे प्राचिनत्व सिद्ध करते. कोकण आणि दख्खनचे पठार यांना जोडणारा महत्वाचा व्यापारी मार्ग प्राचिन काळापासून प्रचलित आहे. अनुस्कुरा घाट आणि आंबा घाट मार्गे होणाऱ्या व्यापारावर नियंत्रण ठेवणे आणि संरक्षणाच्या दृष्टीने पर्नाल पर्वत हे ठिकाण मोक्याचे व महत्वाचे असल्याचे जाणून शिलाहार राजा भोज याने पन्हाळा किल्ला बांधला आणि त्याला आपल्या राजधानीचे स्थान बनवले.

असा हा प्राचीन पन्हाळा शिलाहारांनतर यादव आणि त्यानंतर बहमनी, आदिलशाही अशा सत्ताधिशांच्या अंमलाखाली राहिला. प्रतापगडच्या युद्धानंतर आदिलशाहीमध्ये निर्माण झालेल्या गोंधळाचा फायदा घेत छत्रपती शिवाजी महाराजांनी कोल्हापूर पर्यंतचा आदिलशाही मुलूख जिंकला. त्याचवेळी 1659 मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी पन्हाळा किल्लाही जिंकुन घेतला. त्यानंतर पन्हाळा किल्ल्याला आणखी मजबूत करण्याच्या दृष्टीने त्याच्या समोरच लागून असलेल्या डोंगरावर अर्जोजी यादव यांच्या देखरेखीखाली पावनगड उभारण्यात आला. यामुळे पन्हाळा आणखी भक्कम व भव्य झाला. या किल्ल्यासोबत छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज आणि महाराणी ताराराणी यांच्या जीवनातील अनेक महत्त्वाच्या घटना जोडलेल्या आहेत. मराठा इतिहासापुरता विचार करता स्वराज्यातील अनेक महत्वाच्या लढायांचा आणि प्रसंगांचा मुक साक्षीदार आहे पन्हाळा.



### सिद्दी जोहरचा वेढा आणि पावनखिंडची लढाई

1659 मध्ये कोल्हापूर, पन्हाळा सोबतच दक्षिण कोकणचा प्रांत छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंकल्यानंतर आदिलशाही दरबारामध्ये एकच गोंधळ उडाला. अशा वेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशाही दरबाराने सिद्दी जोहर या सेनापतीची नेमणूक केली. सिद्दी हा अफजल खानाइतकाच क्रूर आणि धूर्त होता. त्याने मराठ्यांसोबत युद्ध पुकारून मिरज मार्गे कोल्हापूर प्रांतावर हल्ला केला. त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांनी लढाईच्या तयारीने पन्हाळा सज्ज केला. सिद्दी जोहरने पन्हाळा गडाला कडक वेढा घातला आणि छत्रपती शिवाजी महाराजांना कैद करण्याची योजना आखली. भर पावसातही वेढ्याचे काम जोराने चालवले. त्यामुळे गडावरील अन्न-धान्य व युद्ध साहित्य कमी होत चालले. या सर्वांचा विचार करून छत्रपती शिवाजी महाराजांनी वेढा फोडून निसटण्याचा बेत आखला. त्यासाठी त्यांनी शिवा काशिद या मावळ्याला वेशांतर करून सिद्दीच्या भेटीस पाठवले आणि आपण स्वतः वाघ दरवाजा उतरून विशाळगडच्या दिशेने कुच केले. शत्रूने मराठा सैन्याचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. त्यावेळी छत्रपतींसोबत रायाजी बांदल आणि त्यांचे सैन्य, शंभुसिंह जाधव, बाजी प्रभू व फुलाजी प्रभू देशपांडे असे कसलेले योद्धे होते. त्यांनी महाराजांना सांगितले की त्यांनी विशाळगड जवळ करावा आणि आम्ही खिंडीत शत्रुला अडवून धरतो. यानुसार रायाजी बांदल आणि त्यांचे सैन्य, शंभुसिंह जाधव, बाजी प्रभू व फुलाजी प्रभू देशपांडे यांनी घोड खिंड (पावन खिंड) येथे सिद्दीच्या सैन्याला रोखून धरले. या खिंडीत झालेल्या लढाईमध्ये दुर्दैवाने हे सर्व वीर धारातिर्थी पडले. त्याचे स्मारक आजही आपल्याला पांढरे पाणी (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथे पहावयास मिळते.

### पन्हाळा पुन्हा स्वराज्यात

सिद्दीच्या वेढ्यानंतर पन्हाळा पुन्हा आदिलशाहीकडे गेला. त्यामुळे कोल्हापूर प्रांतावरील मराठ्यांचे वर्चस्व धोक्यात आले. तसेच राजापूर बंदरातील व्यापारावरही त्याचा परिणाम झाला. त्यामुळे पन्हाळा पुन्हा स्वराज्यात आणण्याचा प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरू केला. 1674 मध्ये हिरोजी फर्जंद या सेनापतीने अवघ्या 60 मावळ्यांनिशी रात्रीचा छापा टाकून पन्हाळा जिंकून घेतला आणि पन्हाळा पुन्हा स्वराज्यात समील झाला.

### औरंगजेबाची स्वारी आणि मराठ्यांची चिवट झुंज

छत्रपती संभाजी महाराज यांनी औरंगजेबास कडवी झुंज देऊन स्वराज्याचे रक्षण केले. त्यानंतर छत्रपती राजाराम महाराज यांच्या नेतृत्वात मराठ्यांनी लढा सुरूच ठेवला. जिंजीहून आल्यानंतर छत्रपती राजाराम महाराज यांनी पन्हाळा ही राजधानी करून काहीकाळ येथूनच कारभार चालवला. यानंतर सन 1700 मध्ये राजाराम महाराज यांचा मृत्यू झाल्यानंतर महाराणी ताराराणी यांनी लढा सुरू ठेवला. महाराणी ताराराणी यांच्या नेतृत्वात मराठा सरदारांनी मुघलांना चिवट झुंझ दिली.

### मराठ्यांची राजधानी पन्हाळा

महाराणी ताराराणी यांनी पन्हाळा येथे राजधानी घोषीत करून कोल्हापूर संस्थांनची स्थापना केली. यानंतर अनेक वर्ष कोल्हापूर संस्थानचा कारभार पन्हाळा किल्ल्यावरून चालत होता. याची साक्ष म्हणजे पन्हाळा किल्ल्यावर असलेले कचेरीचे वाडे.

पन्हाळा हा किल्ला बांधताना दीर्घकालीन लढाईसाठी सुसज्ज असा किल्ला उभारण्यात आला होता. समुद्रसपाटीपासून तब्बल 845 मीटर उंचीवर, आणि 7 चौरस किलोमीटरच्या अफाट विस्तारावर उभा असलेला हा किल्ला, महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या किल्ल्यांपैकी एक आहे. पन्हाळा व पावनगड हे दोन्ही जोडकिल्ले खोल दरीच्या साहाय्याने एकमेकांशी जोडलेले आहेत. शिवकालीन लष्करी दृष्टिकोनातून या दोन किल्ल्यांची सांगड ही एक अपूर्व अशी संरक्षणयंत्रणा होती.

### रचना आणि वैशिष्ट्ये

किल्ल्याच्या मध्यभागी बालेकिल्ला असून तो पूर्वीच्या काळी मुख्य केंद्रबिंदू होता. आजही त्याची मजबूत तटबंदी अभिमानाने उभी आहे. याच आवारात तीन प्रचंड धान्यकोठारे आहेत. त्यापैकी दोन बहामनी काळात बांधले गेलेले, तर तिसरे काळ्या दगडात बांधलेले कोठार मराठाकालीन आहे. या धान्यकोठाऱ्यांमुळे किल्ला दीर्घकाळ शत्रूच्या वेढ्यात टिकून राहू शकत असे. संपूर्ण डोंगराभोवती पसरलेली पन्हाळ्याची भव्य तटबंदी नागमोडी वळणे घेत डोंगरशिखरांवरून पुढे सरकते. त्यामध्ये अनेक गुप्त दरवाजे व मार्ग लपलेले आहेत. तीन दरवाजा, वाघ दरवाजा, चार दरवाजा असे भव्य दरवाजे या किल्ल्याला आहेत. पैकी चार दरावाजा अस्तित्वात नाही. त्याशिवाय आंधार बाव ही बारमाही विहीर या किल्ल्यात आहे. वास्तू रचनेचा अनोखा अविष्कार या ठिकाणी दिसून येतो. तीन दरवाजाच्या वरती श्री. गजाननाचे शिल्प कोरलेले आहे. तर वाघ दरवाजातून खाली जात असताना डाव्या हातास पद्म, मयूर व वरती असलेले गरूड शिल्प हा किल्ला प्राचीन असल्याची साक्ष देत आहे. तटबंदीवर तब्बल 40 हून अधिक बुरुज उभे आहेत. त्यांपैकी काळा बुरुज आणि पुसाटी बुरुज हे विशेष उल्लेखनीय आहेत. मराठ्यांनी हे बुरुज अधिक मजबूत केले, तसेच तोफांसाठी उंच दमदमे उभारले. पन्हाळा हा फक्त लष्करी किल्ला नव्हता. त्याच्या आवारात आजही भव्य राजवाडे, मंदिरे आणि प्रशासकीय इमारतींचे अवशेष दिसतात. अंबारखाना, राजमाता ताराराणींचा राजवाडा आणि विशाल धान्यकोठारे हे त्या काळातील मराठ्यांच्या दूरदृष्टीचे आणि वास्तुकलेचे द्योतक आहेत. या इमारतींमधूनच किल्ल्याचे प्रशासन चालत असे.

**- संजय डी.ओरके**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई.

# महावितरणच्या तेजश्री कार्यालयाबाहेर वीज कामगारांचा संप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : महावितरण कंपनीच्या नफ्याच्या क्षेत्रामध्ये अदानी, टोरेंटो इत्यादी खाजगी भांडवलदाराने वीज वितरणाचे मागितलेले परवाने देण्यास विरोध, महावितरण कंपनीत पुनर्रचना, कामगार कपात, ३२९ विद्युत उपकेंद्रे खाजगी ठेकेदारांना चालविण्यास देणे, महानिर्मिती कंपनीचे ४ जलविद्युत केंद्राचे खाजगीकरण करणे, महापारेषण कंपनी २०० कोटींचे प्रकल्प खाजगी कंपन्यांना देणे, पारेषण कंपनीस शेअर मार्केटमध्ये लिस्टिंग करणे, वीज कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करणे, लाईन स्टॉप व इतर कर्मचाऱ्यांचे कामाचे आठ तास निश्चित करणे, रिक्त पदे मागासवर्गीयाच्या आरक्षणासह भरणे, कंत्राटी कामगारांना कायम करण्याचा धोरणात्मक निर्णय घेणे, पगारवाढ करारानंतर प्रलंबित असलेल्या तिन्ही वीज कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांच्या इतर प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी कृती समितीने संपावर जाण्याचा निर्णय घेतलेला आहे.

महावितरण कंपनीत वाढलेली वीज ग्राहक संख्या लक्षात घेऊन वीज ग्राहकांना चांगली सेवा देण्याकरीता शाखा, उपविभाग व विभागीय कार्यालयाची निर्मिती करावी, महावितरण कंपनीने विकलेल्या प्रत्येक युनिट विजेचे पैसे मिळावे व महसुलात वाढ व्हावी, वीज ग्राहकांना स्वस्त वीज मिळावी आदी मागण्यांसाठी कल्याण मधील तेजश्री या महावितरणच्या कार्यालयाबाहेर वीज कामगारांनी ७२ तासांचा संप सुरु केला आहे.

# रायगड जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापतीपदांच्या आरक्षणाची घोषणा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

## पेण साठी सर्वसाधारण महिला आरक्षण

**पेण** : जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक 2025 पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील 15 पंचायत समित्यांच्या सभापतीपदांचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. आज झालेल्या सोडतीत विविध प्रवर्गानुसार आरक्षण निश्चित करण्यात आले.

घोषित आरक्षणानुसार अनुसूचित जाती-0, अनुसूचित जाती (महिला) प्रवर्गासाठी म्हसळा, अनुसूचित जमातीसाठी तळा, अनुसूचित जमाती (महिला) श्रीवर्धन.नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी कर्जत व माणगाव तर त्याच प्रवर्गातील महिलांसाठी महाड आणि अलिबाग पंचायत समित्या आरक्षित करण्यात आल्या आहेत.

सर्वसाधारण प्रवर्गातील सभापती पदांसाठी खालापूर, उरण, मुरुड आणि पोलादपूर या चार पंचायत समित्या आरक्षित आहेत. तर सर्वसाधारण (महिला) प्रवर्गासाठी पेण, रोहा, सुधागड आणि पनवेल या समित्यांना आरक्षण देण्यात आले आहे.

# महाराष्ट्र गतका संघ दिल्लीसाठी रवाना

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : गतका फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित 10 ते 12 ऑक्टोबर दिल्ली येथे स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ दिल्लीला रवाना झाला आहे. या सब जुनियर व जूनियर स्पर्धेकरिता महाराष्ट्रातील तब्बल 64 खेळाडू सहभागी होत आहेत. त्यामध्ये 37 मुली आणि 27 मुले सहभाग घेणार आहेत. त्याचबरोबर संघ व्यवस्थापक स्मित चौधरी, मानसी पवार आणि संघ प्रशिक्षक अथर्व नलावडे, धीरज कोट, श्रीधर कमले, कोमल शिंदे व मीडिया इन्चार्ज रोहन पवार हे काम पाहणार आहेत. हा सर्व संघ दिल्ली करिता आठ तारखेला रवाना झाला आहे.असोसिएशन ऑफ गतका महाराष्ट्रचे अध्यक्ष संतोष चौधरी, *उपाध्यक्ष अश्विनी महांगडे, प्रा. आरती चौधरी (सचिव), खजिनदार ॲड.सायली जाधव, सदस्य रवींद्र चौधरी (रि.आर्मी), ॲड.मृण्मयी जाधव, अविनाश अनपट(योगगुरु) व सर्व जिल्हा प्रतिनिधी यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

## विद्यार्थ्यास जमिनीवर बसविल्याने

# भिवंडीत मुख्याध्यापकासह शिक्षकावर गुन्हा दाखल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहरातील शांतीनगर भागात सुरु असलेल्या सलाऊद्दीन अय्यूबी मेमोरियल उर्दू हायस्कूल अँड कॉलेज मधील इयत्ता १० वी मधील विद्यार्थ्याला शाळा प्रशासनाने जमिनीवर बसविल्या प्रकरणी शाळेच्या मुख्याध्यापिका आणि एका शिक्षकाविरुद्ध शांतिनगर पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी अल्पवयीन न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) कायद्याच्या कलम ७५ आणि ८७अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. हि कारवाई विद्यार्थ्यांच्या पालकांनी दिलेल्या तक्रारीवरून करण्यात आली.

याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी कि सलाऊद्दीन अय्यूबी मेमोरियल उर्दू हायस्कूल अँड कॉलेजमध्ये ३ ऑक्टोबर २०२५ पासून शाळेच्या पहिल्या सत्राची परीक्षा सुरू झाली होती. पीडित विद्यार्थी तिसऱ्या मजल्यावर जमिनीवर बसून पेपर लिहीत होता. तर इतर सर्व विद्यार्थी बाकावर बसले होते.

या विद्यार्थ्याने फी न भरल्यामुळे शाळा प्रशासनाने पीडित विद्यार्थ्यास इतर विद्यार्थ्यांपासून वेगळे जमिनीवर बसवून परीक्षा द्यायला भाग पाडले. त्यामुळे पीडित मुलगा घरी येऊन रडू लागला आणि दुसऱ्या दिवशी शाळेत जाण्यास त्याने नकार दिला. त्याला इतर मुलांसमोर अपमानित केले गेले आणि त्याची चेष्टा करण्यात आली. त्यानंतर पीडित मुलाच्या वडिलांनी आपल्या मुलीसोबत जाऊन त्याला समजावून शाळेत पोहचविले. पीडित मुलाचे वडील रिक्षा चालक असून ते शांतीनगर येथील बनारसी चाळ मध्ये राहत आहेत. या घटनेची माहिती मिळताच त्यांनी शिक्षकांना जाब विचारला असता शिक्षकाने त्यांना फी न भरण्याचे कारण सांगितले. त्यामुळे त्यांनी शहरातील शिक्षण सुधार समितीचे अध्यक्ष डॉ. कॉम्रेड विजय कांबळे यांची भेट घेतली. कांबळे यांनी तत्काळ पीडित कुटुंबासोबत शांतिनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.पोलिस अधिकाऱ्यांनी प्रारंभी मुलाची परीक्षा बाधित होऊ नये म्हणून थांबण्याचा सल्ला दिला. परीक्षा संपल्यानंतर फैज खान यांनी पुन्हा शाळा प्रशासनाविरुद्ध तक्रार दाखल केली. शांतिनगर पोलिसांनी या प्रकरणात शाळेच्या मुख्याध्यापिका खान अतिया बहूजमा आणि शिक्षक अहमद उल्ला यांच्याविरुद्ध अल्पवयीन न्याय कायदा कलम ७५ (बालकावर क्रूरता) आणि ८७ (बालकाच्या हक्कांचे उल्लंघन) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. पोलिस या प्रकरणाची सखोल चौकशी करत असून पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल दिलीप शिंदे हे करत आहे.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in






**मेष**
काही विशेष कामासाठी लांबचे प्रवास होऊ शकतात. आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. तुम्हाला कुटुंबातील सदस्यांचा पाठिंबा मिळेल.

**वृषभ**
कोणतेही नवीन काम करण्यासाठी दिवस कमजोर आहे.कुटुंबीयांसह कुठेतरी बाहेर जाऊ शकता. कुटुंबात एखाद्याचे लग्न ठरतील.

**मिथुन**
कामात कोणताही बदल करू नका अन्यथा नंतर अडचणींना सामोरे जावे लागेल. रागाच्या वागणुकीमुळे तुमचे मन अस्वस्थ राहील.

**कर्क**
भागीदारीत काही काम सुरू करणे तुमच्यासाठी चांगले राहील. व्यवसायातील काही अडथळे दूर करण्याचा तुम्ही पूर्ण प्रयत्न कराल.

**सिंह**
वादापासून दूर राहा. नौकरीच्या शोधात असलेल्या जातकांना आनंदाची बातमी मिळेल.आर्थिक परिस्थीची काळजी वाटेल. जुने मित्र भेटतील.

**कन्या**
घरातील वातावरण आनंददायी राहील. घरातील वडिलधाऱ्यांशी वाद घालू नका. आज फसवणूक होऊ शकते.कायदेशीर प्रकरणात विजय मिळेल.

**तूळ**
विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या अडचणींबाबत शिक्षकांशी बोलून दाखवावे लागणार.इकडे तिकडे धावपळ करण्यात व्यस्त असाल .

**वृश्चिक**
कोणालाही न विचारता सल्ला देणे टाळावे लागेल. तुम्ही तुमचे घर, वाहन आणि घर इत्यादीसाठी खरेदी करू शकता.तुमचे कुटुंबीय तुमच्यावर नाराज राहतील.

**धनु**
प्रलंबित कामे पूर्ण होतील.पैसे उधार देणे टाळा. कुटुंबाबतील नात्यात गोडवा राहील. नौकरीच्या ठिकाणी वरिष्ठांशी वाद संभवतात.

**मकर**
वाहन खरेदीचे तुमचे स्वप्न पूर्ण होईल, परंतु अनोळखी व्यक्तीच्या प्रभावाखाली कोणतीही मोठी गुंतवणूक करू नका, अन्यथा व्यवसायासाठी हानिकारक असेल.

**कुंभ**
कोणतेही नवीन काम सुरू केले असेल तर ते मध्येच थांबवावे लागेल.मुलांकडून तुम्हाला काही चांगली बातमी मिळू शकते.

**मीन**
मालमत्ता खरेदी करताना तुम्हाला महत्त्वाच्या गोष्टींकडे पूर्ण लक्ष द्यावे लागेल.कामासाठी तुम्हाला लांबच्या प्रवास घडेल.व्यवसायात तोटे संभवतात.

नियमित
वाचा
दै. ठाणे
जीवनदीप
वार्ता






# राज्यस्तरीय 'अभंगवारी २०२५' स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : संगीतवर्षा कला प्रतिष्ठानतर्फे आयोजित राज्यस्तरीय 'अभंगवारी २०२५' या अभंग गायन स्पर्धेची अंतिम फेरी व पारितोषिक वितरण सोहळा रविवार, दिनांक ५ ऑक्टोबर २०२५ रोजी नेहरू नगर, कुर्ला (पूर्व) येथील प्रभोधन प्रयोगघर सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



राज्यभरातून सव्वाशेहून अधिक स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. तीन टप्प्यात पार पडलेल्या निवड प्रक्रियेनंतर अंतिम फेरीस २१ उत्कृष्ट अभंगगायकांची निवड करण्यात आली. या कलाकारांनी संत साहित्यावर आधारित अभंगांचे सुमधुर सादरीकरण करून उपस्थित प्रेक्षकांची मनं जिंकली.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भजनसम्राट श्री. महादेव शहाबाजकर उपस्थित होते, तर ज्येष्ठ शाहीर विष्णू गिलबिले आणि श्री. बबन शेळके हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून स्पर्धकांचे अभिनंदन केले. त्यांनी संत परंपरेच्या जतनासाठी अशा उपक्रमांचे मनःपूर्वक कौतुक केले. यावेळी लोकप्रतिनिधी श्री. भाऊ कोरगावकर यांनीही स्पर्धेला भेट देऊन संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. त्यांनी संगीतवर्षा कला प्रतिष्ठानच्या भावी वाटचालीस शुभेच्छा देत पुढील वर्षी स्पर्धेसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या स्पर्धेत प्रथम- संगमेश्वरी अशोक मोरे दिघा-नवी मुंबई, द्वितीय- दीक्षा हरियाण-भायखळा, तृतीय क्र.लिलाधर पाटोळे-जळगाव, तर तारकेश जोशी- डोंबिवली आणि गौरंगी विरकर- चेंबुर हे उत्तेजनार्थ क्रमांकाचे मानकरी ठरले...

या सोहळयात पखवाज वादक विक्रांत देशमुख यांच्या प्रभावी पखवाज वादनाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. स्पर्धेचे परीक्षण प्रदीप चिटणीस आणि माधुरी पवार यांनी केले. आदित्य खवणेकर-हार्मोनियम, संजय नाईक-तबला, रमेश सावंत-पखवाज वादनाची साथ केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संगीतवर्षा कला प्रतिष्ठानच्या संस्थापिका वर्षा जाधव, अध्यक्ष काकासाहेब जाधव, तसेच राजू शिंदे, अभय जगताप, श्री.योगेश जगदाळे, उज्वला शिवरकर, विशाल राजगुरु, संतोष साखरे, विजया इंदलकर, श्रीराम कुळकर्णी, श्री. विश्वनाथ पांचाळ, श्री.विशाल गिलबिले, श्री. उत्तम कोळंबेकर, किरण साळवे, सीमा सावंत आणि सुशीला गांगुर्डे यांच्या परिश्रमांचे विशेष कौतुक करण्यात आले.

संगीतवर्षा कला प्रतिष्ठानतर्फे राज्यस्तरीय गायन स्पर्धा आयोजनाचे हे सलग तिसरे वर्ष असून, संस्थेच्या या सातत्यपूर्ण उपक्रमामुळे नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळत आहे आणि संत साहित्याची अभंग परंपरा अधिक बळकट होत आहे.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी अनेक सामाजिक बांधव, रसिक श्रोते, कलाकार आणि शुभचिंतकांनी आर्थिक तसेच संगीत सेवा देऊन सहकार्य केले. त्यांच्या या नि:स्वार्थ योगदानामुळेच कार्यक्रम भव्य आणि यशस्वीपणे पार पडला.

# निवृत्त वेतनधारकांच्या प्रलंबित मागण्या तात्काळ निकाली काढा

## तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विविध मागण्यांसाठी ठाणे जिल्हा परिषदेतील निवृत्त वेतनधारक लढा देत आहेत. याच पार्श्वभूमीवर पेन्शनर वेल्फेअर असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचा पाढा त्यांच्या समोर मांडला. यावेळी घुगे यांनी सर्व खातेप्रमुखांना निवृत्त वेतनधारकांच्या प्रलंबित मागण्यांवर तत्काळ कार्यवाही करून त्या निकाली काढण्याचे निर्देश दिले.



महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियमांमध्ये राज्य शासन किंवा अन्य प्राधिकरण यांना अतिप्रदान वसुली करण्याबाबत विशिष्ट तरतुदी असल्या तरी, सर्वोच्च न्यायालयाने अशा अतिप्रदान रकमेची वसुली करू नये, असे आदेश दिले आहेत. ही बाब लक्षात घेऊन, तसेच ग्रामविकास विभागाच्या १० फेब्रुवारी २०२० रोजीच्या पत्रातील निर्देशांचा विचार करून, सेवा निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या कर्मचारी तसेच पाच वर्षांपेक्षा जुनी अतिप्रदान रक्कम वसूल करू नये, असे आदेश तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी दिले आहेत. तसेच, अशा प्रकारची वसुली आधीच झाल्यास ती रक्कम संबंधितांना परत करावी, अशा सूचना देखील त्यांनी केल्या आहेत.

तसेच, दोन टंकलेखन आवश्यक समजून काढून घेतलेले लाभ आणि रोखलेले लाभ याबाबत ग्रामविकास विभागाच्या २५ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या पत्रानुसार तसेच विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या २४ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या मार्गदर्शनानुसार प्रस्ताव मान्यतेसाठी तात्काळ सादर करावा, अशा सूचना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) अविनाश फडतरे यांना दिल्या आहेत.

# सरेभाग शाळेसाठी योगदान देणाऱ्या शिक्षकांचा निरोप समारंभ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण तालुक्यातील वाशी ग्रामपंचायत हद्दीतील सरेभाग येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील माजी मुख्याध्यापक मनोज थळे, मीनाक्षी जांभळे, विलास पाटील या गुणी शिक्षकांचा निरोप समारंभ सरेभाग शाळेत अत्यंत भावनिक वातावरणात संपन्न झाला.



या सर्व शिक्षकांचे खूप मोठे योगदान सारेभाग शाळेला लाभले, शिक्षकांच्या प्रामाणिक प्रयत्न आणि अथक मेहनतीमुळे ज्या शाळेत मुलांना बसायला नीट जागा नवती, इमारत अतिशय दुरावस्थेत होती हे सर्व रूपडे बदलून टाकून या शाळेची सुसज्ज इमारत, क्रीडांगण, रंगमंच, स्वच्छतागृह , संगणक सुविधा अशा सर्व सुविधा शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांनी निर्माण केल्या वेळ प्रसंगी स्वतःच्या खर्चातून मोठी आर्थिक मदत करून ग्रामस्थानी मोलाचं सहकार्य केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गणवेश, टीशर्ट , दफ्तर व इतर शालोपयोगी वस्तू भेट दिल्या तसेच रोख रक्कम१० हजार रुपये देणगी स्वरूपात दिली. निरोप घेताना विद्यार्थ्यांनी शाळेत शिकविलेल्या कलाकृती बनवून शिक्षकांना भेट दिला त्यामुळे आमची मेहनत सफल झाली असे उद्गार शिक्षिका सौ. मीनाक्षी जांभळे यांनी व्यक्त केले.शाळेसोबत कायम ऋणानुबंध राहतील असे मनोज थळे गुरूजी व विलास पाटील गुरुजींनी आपल्या मनोगतात सांगितले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ पुनम पाटील यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले व मागील सर्व शिक्षकांचा आदर्श घेऊन अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने शाळेसाठी व विद्यार्थ्यांसाठी प्रामाणिक कार्य करणार असा ठाम निर्धार व्यक्त केला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व प्रमुख उपस्थिती म्हणून सेवानिवृत्त शिक्षक जो. ह. ठाकूर गुरुजी, बापू गुरुजी, स्मिता म्हात्रे बाई , शिवतेज युवा फाउंडेशन रायगडचे अध्यक्ष हेमंत पाटील शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनील म्हात्रे, गिरीश म्हात्रे, स्वप्नील म्हात्रे, जयवंत म्हात्रे, शारदा काकू, दत्त वर्तक, बळीराम पाटील , स्वप्नाली म्हात्रे, आदी मान्यवरांसह पालक ,ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव सातवी यांनी केले.

# केडीएमसीची अनधिकृत पोस्टर, फलक, बॅनर्स, होर्डिंग फ्लेक्स, झेंडे हटविण्याची कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : नवरात्री उत्सवनिमित्त विविध सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक व धार्मिक मंडळांकडून शहरातील सार्वजनिक ठिकाणी, चौकांवर, शासकिय इमारतींवर आणि रस्त्यांच्या कडेला लावण्यात आलेले अनधिकृत जाहिरात पोस्टर, फलक, होर्डिंग, फ्लेक्स, बॅनर्स, झेंडे इ. या बाबत उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ मधील आदेशानुसार हे सर्व साहित्य उत्सव संपल्यानंतर तात्काळ काढून टाकणे आवश्यक असल्याचे निर्देश दिले आहेत.

या आदेशाच्या अंमलबजावणीस अनुसरून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत शहरातील विविध भागात व्यापक कारवाई करण्यात आली. या कारवाईत पोस्टर फलक ७७३, बॅनर २३९०, झेंडे ३०३, कमानी ३५ असे एकूण ३५०१ हटविण्यात आले आहेत. नागरिकांच्या सहकार्याने शहराचे सौंदर्य राखण्यासाठी ही कारवाई करण्यात आली असून, पुढील काळातही असे अनधिकृत पोस्टर, बॅनर, व जाहिराती लावणाऱ्यांवर मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध कायदया अतंर्गत कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महानगरपालिका प्रशासनाने दिला आहे. महानगरपालिकेकडून सर्व सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक व धार्मिक मंडळांनी उत्सव संपल्यानंतर आपल्या जबाबदारीवरून सर्व जाहिराती व बॅनर काढून टाकावेत, ज्यायोगे शहराचे स्वच्छ व आकर्षक रूप कायम राहील असे आवाहन केडीएमसी उपायुक्त समीर भूमकर यांनी केले आहे.



# ठाण्यात ऑक्सिजन पार्कची निर्मिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. ९** : ठाणे पालिकेकडून ठाणेकरांच्या आरोग्याच्या दृष्टीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. अशातच आरोग्याची काळजी घेत, विरंगुळादेखील व्हावा, या उद्देशाने पालिकेने हिरानंदानी मेडोज परिसरात राजमाता जिजाऊ उद्यानात ऑक्सिजन पार्कची निर्मिती केली आहे. या उद्यानात विविध प्रजातीची व औषधी अशी १०० हून अधिक झाडांची लागवड केली असून, ७५ वर्षे जुन्या वड आणि पिंपळ झाडांचे जतन करण्यात आले आहे. त्याचबरोबर या ठिकाणी मॉर्निंगवॉक, योगा, व्यायाम करण्याच्या व्यवस्थेसह बांबू पथ, छोट्या तलाव सौंदर्याकरण करण्यात आले असल्याची माहिती पालिकेने दिली.



ठाणे पालिका क्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या उद्यानांचा कायापालट पालिकेच्या उद्यान विभागामार्फत करण्यात येत आहे. त्यानुसार पोखरण दोन भागातील हिरानंदानी मेडोज परिसरात पालिकेचे सुमारे साडेतीन एकर जागेत राजमाता जिजाऊ उद्यान असून, या ठिकाणी केवळ झाडांची लावगड करण्यात आलेली होती. पालिकेने या उद्यानाचे नुकतेच नूतनीकरण केले असून, त्यात येथे ऑक्सिजन पार्कची निर्मिती केली आहे. या उद्यानाला राजमाता जिजाऊ ऑक्सिजन पार्क असे नाव दिले आहे.

संपूर्ण उद्यान फुलझाडांनी, औषधी वनस्पतींनी आणि हिरवाईने नटलेले असेल. या झाडांमुळे परिसरातील हवामान अधिक शुद्ध होईल. नागरिकांना सकाळ आणि संध्याकाळी फेरफटका मारण्यासाठी शुद्ध वातावरण मिळेल.

तसेच लहानसा तलाव तयार करण्यात आला असून, त्या ठिकाणी जलचर प्राणी ठेवण्यात येणार आहेत. नागरिकांना योगा आणि व्यायाम करता यावा, यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. पक्ष्यांना त्रास होऊ नये म्हणून विद्युत दिवे कमी उंचीवर बसविण्यात आलेले आहेत. मार्गालगत बांबूची लागवड करण्यात येणार आहे, अशी माहिती ठाणे महापालिकेचे उद्यान विभागाचे उपायुक्त मधुकर बोडके यांनी दिली.

# सौ. कमलताई किसन कथोरे महाविद्यालयात आरोग्यावर जनजागृती




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष ठाणे आणि आयसीटीसी उपजिल्हा रुग्णालय बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'इंटिसिफाईड आय.ई.सी. कॅम्पेन' अंतर्गत जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई संचलित सौ. कमलताई किसन कथोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, म्हसा येथे दि. ०९ ऑक्टोबर, २०२५ रोजी आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रम पार पडला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शारीरिक व मानसिक आरोग्याची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याने किशोरावस्था, व्यसनमुक्ती, स्वतःचे संरक्षण आणि आहारविषयक शिस्त यावर सविस्तर माहिती देण्यात आली. आयसीटीसी समुपदेशक सरीता राठोड यांनी किशोरावस्थेतील शारीरिक व मानसिक बदल, ताणतणावावर मात करण्याचे उपाय तसेच व्यसनाचे घातक परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. प्रयोगशाळा तंत्रज्ञ अमोल इसामे यांनी एचआयव्ही-एड्स प्रतिबंध व नियंत्रण कायदा २०१७, ईव्हीटीएचएस, एसटीआय/आरटीआय संदर्भातील माहिती विद्यार्थ्यांसमोर सोप्या भाषेत मांडली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढली.

२०० हुन अधिक विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विजय सोनार सर तरआभारप्रदर्शन प्रा. मयुरी घागस मॅडम यांनी केले.

# ठाणे मनपात लोकशाही दिनाचे आयोजन

## 20 ऑक्टोंबर पूर्वी निवेदने सादर करण्याचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (०९)** : ठाणे महापालिकेचा पुढील लोकशाही दिन सोमवार, ०३ नोव्हेंबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी नोव्हेंबर महिन्याच्या लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी म्हणजेच २० ऑक्टोंबरपूर्वी त्यांचे अर्ज-निवेदने महापालिका भवन, नागरी सुविधा केंद्र येथे दोन प्रतीत सादर करावेत. निवेदन दाखल करताना अर्जदाराने प्रत्येक निवेदना सोबत प्रपत्र-१ (ब) सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र-१ (ब) नागरी सुविधा केंद्र येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. प्रसुधा-१०९९/सीआर-२३/९८/१८-अ, दिनांक २६ सप्टेंबर २०१२ नुसार माहे डिसेंबर-२०१२पासून लोकशाही दिनाच्या दिवशी नागरिकांचे निवेदन न स्विकारता, हे निवेदन दोन प्रतीत लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी महापालिका कार्यालयात सादर करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

मुख्यालयातील या लोकशाही दिनामध्ये, परिमंडळ लोकशाही दिनात ज्या नागरिकांनी आपली निवेदने सादर केलेली आहेत, तसेच ज्या निवेदनावर १ महिन्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच निवेदनांचा स्वीकार करण्यात येईल. नागरिकांनी महापालिका मुख्यालयातील लोकशाही दिनामध्ये निवेदन सादर करताना परिमंडळ लोकशाही दिनामध्ये मिळालेला टोकन क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

अर्जदाराने एका अर्जात एकच तक्रार सादर करावी, एकापेक्षा जास्त तक्रारी असलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही. त्याचप्रमाणे आस्थापना विषयक, विविध न्यायालयात, लोकआयुक्त यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाच्या तक्रारी, माहिती अधिकार कक्षेत येणारी प्रकरणे, तसेच राजकीय पक्षाच्या, नगरसेवकांच्या संस्थेच्या लेटरहेडवरील अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे किंवा देण्यात येणार आहे, अशा प्रकरणी केलेला अर्ज, तक्रार वैयक्तिक स्वरुपाची नसेल तर असे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

# खडकपाडा पोलीसांनी नागरिकांना परत केले हरवलेले मोबाईल



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : नागरिकांचे हरवलेले महागडे मोबाईल फोन खडकपाडा पोलिसांकडून संबंधितांना आज परत देण्यात आले. कल्याणचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या निर्देशानुसार खडकपाडा पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या हस्ते नागरिकांचे हरवलेले हे मोबाईल फोन परत करण्यात आले. ज्यामध्ये एकूण २५ मोबाईल फोन, ज्यांची एकत्रित किंमत सुमारे ३ लाख ६५ हजार रुपये इतकी आहे. हरवलेला मोबाईल मिळाल्याने अनेकांच्या चेहऱ्यावर दिलासा आणि आनंद दिसून येत होता.

या मोबाईल हस्तांतरण कार्यक्रमासोबतच ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या संकल्पनेतून आयोजित सायबर जनजागृती उपक्रमही यावेळी राबवण्यात आला. वाढत्या ऑनलाइन फसवणुकीच्या घटना लक्षात घेता सायबर फ्रॉडपासून बचाव करण्यासाठी आवश्यक असणारी खबरदारी, सुरक्षित इंटरनेट वापराचे नियम, संशयास्पद लिंक आणि कॉल टाळण्याचे मार्ग याबाबत नागरिकांना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, जर कोणी सायबर फ्रॉडचा बळी ठरले, तर तात्काळ १९३० किंवा १९४५ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. या माध्यमातून तातडीने मदत मिळू शकते आणि नागरिकांचे आर्थिक नुकसान टाळता येते असे एसीपी कल्याणजी घेटे यांनी स्पष्ट केले.



# जीवनदीप महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत स्वच्छता मोहीम



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली :** जेथे स्वच्छता तेथे समृद्धी तसेच उत्तम आरोग्य पहावयास मिळते. जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या अंतर्गत महाविद्यालय परिसरात दिनांक ०८- १०- २०२५ रोजी ठीक ९.३० मि. स्वच्छता ही सेवा उपक्रमांतर्गत महाविद्यालय परिसरातील कागद, कचरा प्लास्टिक वेचत विद्यार्थी व नागरिक यांना स्वच्छतेचा संदेश देत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे, सचिव. सौ स्मिता घोडविंदे , संचालक. प्रशांत घोडविंदे ,डायरेक्टर.डॉ. के .बी कोरे , प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे या सर्वांचे मोलाचे सहकार्य या स्वच्छता मोहिमेला लाभले.

एन एस एस विभागप्रमुख प्रा. दिनेश धनगर, प्रा. धनश्री नाईक, एन एस एस स्वयंसेवक , विद्यार्थी या सर्वांच्या सहकार्याने सदर स्वच्छता मोहीम उत्तम रीतीने पार पडली.

# पूरग्रस्त कुटुंबांना शिवसेनेच्या वतीने मदत



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** मराठवाड्यातील जालना आणि बीड येथील आसपासच्या गावातील बऱ्याचशा भागात अतिवृष्टीमुळे नागरिकांचे हाल झाल्याकारणाने शिवसेनेच्या माध्यमातून एक मदतीचा हात म्हणून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने आणि कल्याण लोकसभेचे खासदार,संसदीय नेते डॉ श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कल्याण ग्रामीण आमदार राजेश मोरे ह्यांच्या नेतृत्वात मराठवाडा येथील जालना,बीड आणि सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त भागात एकूण ४५०० कुटुंबांपर्यंत जीवनावश्यक गरजेच्या वस्तूंची मदत पोहचविली जात आहे. आज बीड जिल्हा तालुका येथील कुर्ला गाव येथे सकाळी १० वाजता सिंदपाना नदी किनाऱ्यावरील एकूण १४ गावांच्या आपतग्रस्त शेतकरी कुटुंबियांना गरजेच्या वस्तू असलेल्या किटचे वाटप करण्यात आले. शिवसेना कल्याण लोकसभा मतदार संघातील कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्या नेतृत्वात उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, माजी नगरसेवक राजन मराठे, डोंबिवली युवासेना अध्यक्ष सागर जेधे, उपतालुका प्रमुख राहुल गणपुले, युवासेना विधानसभा अध्यक्ष सूरज मराठे, संजय निकते हे पदाधिकारी उपस्थित आहेत. बीड जिल्हा शिवसेना जिल्हा प्रमुख अनिल जगताप, सचिन मुलुक, स्वप्नील गलधर आणि श्याम सुंदर पडुले कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती ह्यांच्या प्रयत्नातून आणि नियोजनातून हा वाटप कार्यक्रम पार पडला.

# महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी समिती कटिबद्ध

## – महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती प्रमुख मोनिका राजळे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** समस्याग्रस्त व गरजू महिला आणि बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीच्या माध्यमातून सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल, असे समितीच्या प्रमुख तथा आमदार मोनिका राजळे यांनी सांगितले. महिला व बालकांचे आरोग्य, शिक्षण, सुरक्षा आणि पुनर्वसनसंदर्भात योग्य सुविधा देण्यात येत असून, अधिक परिणामकारक व दीर्घकाळ उपाययोजना राबविण्यासाठी शासनास योग्य शिफारसी करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. समितीने मुंबईतील भायखळा कारागृह, शताब्दी रुग्णालय (गोवंडी), बालसुधारगृह आणि महिला सुधारगृह (मानखुर्द) तसेच शहाजी मॅटर्निटी हॉस्पीटल (मानखुर्द) या संस्थांना भेट देऊन पाहणी केली. या भेटीदरम्यान महिला व बाल विकास विभाग आणि नगरविकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा घेण्यात आला.या प्रसंगी आमदार मोनिका राजळे, सीमा हिरे, ॲड. श्रीजया चव्हाण, रंजना जाधव, सरोज आहिरे, सना मलिक, महेश सावंत, डॉ. ज्योती गायकवाड, चित्रा वाघ, डॉ. प्रज्ञा सातव, सुनिल शिंदे, डॉ. मनीषा कायंदे, मुंबई शहराच्या महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार, उपनगराचे अधिकारी संजय धनगर, उपायुक्त सुवर्णा पवार, ठाण्याच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नमिता शिंदे, प्रेमा घाटगे आदी उपस्थित होते.

समिती सदस्यांनी महिला कारागृहाला भेट देऊन तेथील महिला बंदिवानांशी संवाद साधला. त्यांच्या आरोग्य, आहार, पाणीपुरवठा, ग्रंथालय, कौशल्य प्रशिक्षण आणि मुलांसाठी असलेल्या अंगणवाडीबाबत माहिती घेतली. महिलांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल, असा विश्वास समिती सदस्यांनी दिला. शताब्दी रुग्णालय आणि शहाजी रुग्णालय येथे समितीने महिला व बालकांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांची पाहणी केली आणि समाधान व्यक्त केले. मातृवंदना योजना, लक्ष्य योजना, औषधसाठा, स्वच्छता, सुरक्षा, सीसीटीव्ही व्यवस्था याची पाहणी केली. बालसुधारगृह व महिला सुधारगृह (मानखुर्द) येथे महिलांच्या मानसिक आरोग्य, शिक्षण, समुपदेशन आणि पुनर्वसनाच्या उपक्रमांची माहिती घेऊन समाधान व्यक्त केले.

समिती प्रमुख मोनिका राजळे म्हणाल्या की, महिला व बालकांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा, आधुनिक यंत्रसामग्री आणि सुरक्षित निवास उपलब्ध व्हावा यासाठी शासनाला ठोस शिफारसी करण्यात येतील. समस्याग्रस्त आणि गरजू महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी समिती सर्वोतोपरी सहकार्य करेल. या दौऱ्याद्वारे समितीने महिला व बालकांच्या कल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांची सद्यस्थिती जाणून घेतली. आगामी काळात त्यांची अंमलबजावणी अधिक प्रभावी व्हावी यासाठी शासनाला योग्य त्या शिफारसी करण्यात येणार आहेत. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी महिलांच्या मुलांशी गळा भेटीच्या उपक्रमांबद्दल, सामाजिक संस्थांच्या माध्यमातून चालणाऱ्या समुपदेशन आणि कायदेविषयक मदतीबद्दल माहिती दिली. उपायुक्त सुवर्णा पवार यांनी महिलांना सुधारगृहात दिल्या जाणाऱ्या रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षणाबाबत सांगितले. या प्रशिक्षणातून मिळणारी रक्कम महिलांना सुधारगृहातून बाहेर पडताना दिली जाते, ज्यामुळे त्यांचे पुनर्वसन सुलभ होते. कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. दक्षा शहा यांनी महिला व बालकांसाठी उपलब्ध आरोग्य सुविधा, खाटा, आयसीयू, सोनोग्राफी, तसेच "स्वस्थ नारी सशक्त परिवार" योजनेबाबत माहिती दिली.दौऱ्यावेळी विशेष पोलिस महानिरीक्षक योगेश देसाई, अधीक्षक विकास राजनळवार, जेलर अमृता यशवंते, संतोषी कोळेकर, पौर्णिमा सोनवणे, कल्पना खंबाईत, जिल्हा बालसंरक्षक मीरा गुडिले, अधिक्षीका निशिगंधा भवल, तसेच आरोग्य अधिकारी डॉ. संतोष गायकवाड, डॉ. वैशाली चंदनशिवे यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

# आंबिस्ते आश्रमशाळेतील दोन विद्यार्थ्यांची आत्महत्या



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा :** पद्मश्री अण्णासाहेब जाधव, भारतीय समाज उन्नती मंडळ संचालीत, भिवंडी यांचे अंर्तगत येणाऱ्या माध्यमिक आश्रमशाळा आंबिस्ते येथील प्राथमिक व माध्यमिक अनुदानीत आश्रमशाळेतील इयत्ता दहावीत शिकणारा देविदास परशुराम नवले (वय १५ वर्ष) आणि नववीत शिकणारा मनोज सीताराम वड (वय १४) या दोघांनी रात्री १.३० च्या सुमारास शाळेच्या पाठीमागे वसतीगृहाच्या समोर असलेल्या एका झाडाला कपडे सुकविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या नायलॉनच्या दोरीने गळफास लावून जीवनयात्रा संपवल्याची घटना घडली आहे. सदर दोन्ही विद्यार्थि हे आदिवासी समाजातील असून मोखाडा तालुक्यातील आहेत. देविदास हा मोखाडा तालुक्यातील दापटी पैकी बिवलपाडा येथील रहिवासी होता तर मनोज हा मोखाडा तालुक्यातील दापटी नंबर - १ येथील रहिवासी होता. हे दोन्ही विद्यार्थी पहिलीपासून याच आश्रमशाळेत शिक्षण घेत होते. यांच्या आत्महत्येमागील कारण अद्याप गुलदस्त्यात असून विद्यार्थ्यांच्या आत्महत्येमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# वीर हुतात्मा भाई कोतवाल चौकात बसवले स्मृतिचिन्ह

## जीवन पाटील यांच्या मागणीला यश






दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** पेण शहराच्या अभिमानाचे प्रतिक असलेल्या वीर हुतात्मा भाई कोतवाल चौकातील स्मृतिचिन्ह गेल्या काही महिन्यांपासून तेथील ठिकाणी नसल्याने या संदर्भात १ ऑक्टोबर २०२५ रोजी पेण नगरपरिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक जीवन पाटील त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेट घेऊन स्मृतिचिन्ह पुन्हा बसविण्याची मागणी पेण शहरातील सामाजिक कार्यकर्ते जीवन शंकर पाटील यांनी केली होती .

याबाबत मुख्याधिकारी साहेबांनी तत्परतेने विषयाची दखल घेतली व आपल्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन केवळ दोन चार दिवसांत काम हाती घेण्याची ग्वाही दिली. त्या शब्दाला जागून त्यांनी ८ ऑक्टोबर २०२५ रोजी वीर हुतात्मा भाई कोतवाल यांच्या हातात स्मृतिचिन्ह बसवून स्वतः स्मृतिचिन्ह प्रस्थापित केल्याचा फोटो व संदेश पाठवला. शहराच्या सांस्कृतिक अभिमानाशी निगडित असलेल्या या कार्यासाठी त्यांनी दाखविलेल्या कर्तव्यनिष्ठा, संवेदनशीलता व कार्यदक्षता या बद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. तसेच या कामात विशेष सहकार्य व समन्वय केल्याबद्दल वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांचेही मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. नगरपरिषद व पोलिस विभागाने नागरिकांच्या भावनांचा सन्मान राखत केलेले हे कार्य नक्कीच कौतुकास्पद असल्याचे सांगितले आहे.शहरातील ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसाच्या जतनासाठी अशाच प्रकारचे सहकार्य दोन्ही विभागांकडून भविष्यातही कायम राहील, अशी अपेक्षा व्यक्त केल्याची माहिती निवृत्त सहाय्यक जलअभियंता बृहन्मुंबई महानगर पालिका व पेण शहरातील सामाजिक कार्यकर्ते जीवन शंकर पाटील यांनी दिली.

# पूरग्रस्तांसाठी ज्ञानदाता शिक्षण संस्थेचा मदतीचा हात



## शिक्षकांचा एक दिवसाचा पगार व विद्यार्थ्यांच्या खाऊचे पैसे पुरग्रस्तांसाठी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मराठवाड्यासह राज्यातील इतर भागात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात हानी झालेली आहे. सदर परिसराचे भागातील लोकांना शासन स्तरावर मदत केली जात आहे. शासनाच्या या मदत कार्यात खारीचा वाटा म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुनील फापाळे याचे मार्गदर्शनाखाली ज्ञानदाता शिक्षण प्रसारक मंडळ, मुंब्रा या संस्थेच्या कळवा, मुंब्रा, दिवा व कोपर येथील शाळांनी मदतीचा हात दिला आहे.

या शाळांमधील सुमारे 200 शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचे वेतन व संस्थेने काही रक्कम टाकून 251000/- रुपये ( दोन लाख एक्कावंन हजार रुपये) चा धनादेश "मुख्यमंत्री सहायता निधीसाठी" उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सुपूर्त केला. विशेष बाब म्हणजे संस्थेच्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी खाऊ साठी मिळालेले पैसे देखील यासाठी दिले आहेत.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुनील फापाळे, संस्थेच्या सचिव सविता फापाळे, संस्थेचे खजिनदार ॲड. अनिकेत फापाळे, संस्थेच्या प्रशासकीय अधिकारी बागुल मॅडम, मुख्याध्यापक खरमाळे व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मदतीमुळे संस्था, शिक्षक व मुलांच्या या कृतीचे समाजातील सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

# अल्प मुदत व्यवसाय अभ्यासक्रमांचे ऑनलाईन उद्घाटन




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** पद्मश्री सिंधुताई सपकाळ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शहापूर येथे अल्प मुदत व्यवसाय अभ्यासक्रमांचे ऑनलाईन उद्घाटन पार पडले. यामध्ये तालुका स्तरावर कौशल्य प्रशिक्षण जागृती अभियान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑनलाईन माध्यमातून संवाद साधत महाराष्ट्रातील 419 शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नव्याने सुरू झालेल्या अल्प मुदत व्यवसाय अभ्यासक्रमांचे कौतुक केले. तर या प्रशिक्षणांमुळे युवकांना रोजगार, उद्योजकता आणि आत्मनिर्भरतेच्या नव्या संधी उपलब्ध झाल्याचे सांगून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली आहे. या अनुषंगाने शासकीय तांत्रिक विद्यालय, शहापूर येथे अल्प मुदत व्यवसाय अभ्यासक्रमांचे ऑनलाईन उद्घाटन पार पडून कौशल्य प्रशिक्षण जागृती अभियान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नव्याने सुरू करण्यात आलेल्या सुसज्ज व्यवसाय प्रयोगशाळांचे उद्घाटन उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी दिनेश घोलप, विश्वकर्मा संस्थेचे पदाधिकारी विनोद शिंदे, सिद्धी राऊत, प्राचार्य राम हिरे, पत्रकार पंडीत मसणे, जनार्दन भेरे, सुनिल घरत, उद्योजक नीतेश लोणे, सुनिल निचिते, ईशा भरोदे, नम्रता बांगर, बचतगट प्रतिनिधी रंजना थोरात, प्रणाली सपाट आदीजण उपस्थित होते. तर उपस्थित मान्यवर यांनी विद्यार्थ्यांना याबाबत माहिती देत मार्गदर्शन केले. दरम्यान, या उपक्रमामुळे शहापूर तालुक्यातील युवकांमध्ये कौशल्य शिक्षण, अल्प मुदत अभ्यासक्रम आणि उद्योजकतेविषयी जागरूकता व प्रशिक्षण मिळून स्थानिक स्तरावर रोजगार निर्मितीची नवी दिशा मिळणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निदेशक दीपिका माळी व श्वेता साळुंखे यांनी केले तर यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे शिल्पनिदेशक जीवन पाटील, प्रशांत घनगाव, सहा. अधिव्याख्याता नितिन महाजन, निदेशक राजेश खांडे, करण वळवी आदी संस्थेतील शिल्प निदेशक व कार्यालयीन कर्मचारी यांनी परिश्रम घेत नियोजन केले होते.

# प्रलंबित मागण्यांसाठी श्रमजीवीच्या महिलांचा तहसील कार्यालयावर ठिय्या

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा :** तालुक्यातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या महिलांच्या प्रश्नांवर श्रमजीवी संघटनेच्या वतीने तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करून प्रशासनाला जाब विचारला. तालुक्यातील निराधार महिलांना केवायसी करण्यासाठी हेलपाटे मारावे लागत असून त्यांना ग्रामपंचायत कार्यालयातच सरसकट योजनांचा लाभ देण्यात यावा, अंगणवाडीमध्ये गरोदर महिलांना अमृत आहार देण्यासाठी टाळाटाळ केली जात असून या महिलांसाठी तात्काळ आहार उपलब्ध करून देण्यात यावा, तालुक्यातील आरोग्य उपकेंद्रामध्ये परिचारिका निवासी राहणे आवश्यक आहे, मात्र निवासी राहत नसल्याने रुग्णांची हेळसांड होते. निवासी राहत नसलेल्या डॉक्टर व परिचारिका यांच्यावर कारवाई करण्यात यावी. वाडा तालुक्यात जनजीवन



मिशन योजना राबवली जात असून अजूनही योजना अपूर्ण अवस्थेत असून पूर्ण झालेल्या योजनांचे पाणी लोकांपर्यंत पोहोचत नसल्याने महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे, संबंधित योजनांची कामे घेतलेल्या ठेकेदारांवर कारवाई करण्यात यावी व योजनांची कामे तत्काळ सुरू करण्यात यावीत, वाडा हा ग्रामीण तालुका असून ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यापासून रोजगारापासून वंचित कुटूंबाना तत्काळ रोजगार हमी योजनेचे काम देण्यात यावे, अजूनही आदिवासी गाव पाडे रस्त्यांपासून वंचित असून हे रस्ते नसल्याने नागरिकांना विविध आरोग्य शिक्षणाच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. तसेच अशा रस्ते नसलेल्या गाव पाड्यांचा तत्काळ रस्ते मंजूर करावेत, तालुक्यातील अनेक कुटुंबाच्या घरापर्यंत आजही वीज पोहचली नाही अशा सर्व वाड्या पाड्यांमध्ये विजेची व्यवस्था करून वीज पुरवण्यात यावी, यापूर्वी आदिवासी आदिम व द्रारिद्य रेषेखालील कुटुबांना सौभाग्य योजनांमधून वीज मीटर देण्यात आले होते मात्र सदर कुटुंबे ६-७ महिने दरवर्षी स्थलांतरित होतात यापैकी अनेक कुटुंबाना वीज जोडण्या न देताच वीजबिल आकारले गेले आहे हे वीज बिल न भरल्याचे व ही कुटुंबे स्थलांतरित असताना मीटर हे महावितरण ने काढून नेले आहेत हे वीज मीटर देऊन तत्काळ वीज जोडण्या देण्यात याव्यात, तालुक्यातील आदिवासी विकास प्रकल्पाच्या अंतर्गत आश्रमशाळांमध्ये शिक्षक निवासी राहत नसून प्रत्यक्ष पाहणीमध्ये अस्वच्छता आढळून आली आहे, पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था नाही, सीसीटीव्ही नसल्याने आरोग्याचा व सुरक्षेचा प्रश्न येत असून संबंधित आश्रमशाळांमध्ये कारवाई करून तत्काळ उपाययोजना होणे आवश्यक आहे, तालुक्यातील महिला सक्षमीकरणासाठी शासनाने प्रत्येक ग्रामपंचायतीला निधी दिला असून तो निधी २०२५ पासून तसाच पडून असून हा निधी महिला बचत गटांना देण्यात यावा, तालुक्यामध्ये घर बांधायला जागा नाही म्हणून ७५ गांवठाण प्रस्ताव दाखल केलेले असून सदर प्रस्ताव अजूनही वनविभागाकडे प्रलंबित आहेत हे प्रस्ताव तत्काळ मंजूर करण्यात यावेत. शासनाच्या स्वामित्व योजने अंतर्गत घरे गांवठाण क्षेत्रात असताना त्यांची योग्य मोजमापे घेतली गेली नाहीत. त्यांची योग्य मोजमापे घेण्यात यावीत, अनेक कुटुबांना घरे गांवठाण क्षेत्रात असताना वंचित ठेवले आहे त्यांना तत्काळ योजनेत घेऊन सनद वाटप करण्यात यावी, या मागण्यांसाठी सायंकाळी उशिरा पर्यंत श्रमजीवीच्या शेकडो महिला आंदोलकांनी तहसील कार्यालयासमोर ठाण मांडले.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई | नवी मुंबई | ठाणे | पालघर | रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.



## नागरिकांकडून प्रशासनाकडे मागणी

कल्याण पश्चिम येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात केडीएमसी मुख्यालयासमोरच्या पदपथावर ए.जी. रेडीमेड या दुकानासमोरील गटाराच्या झाकणाची दुर्दशा झालेली असून गटारावर झाकण नसल्याने दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर गटारावर झाकण बसवून पदपथ दुरुस्त करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024